07 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शालेय जीवनातच सुसंस्कार रूजवण्याची गरज

## पालकमंत्री सतेज पाटील यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात शारदाबाई पवार अध्यासनाचा परिसंवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

भावी पिढी स्त्री–पुरुष समानतेच्या विचारांची निर्माण करायची असेल तर त्याची बीजे व संस्कार शालेय जीवनात रुजवण्याची गरज आहे. या अभियानाची सुरूवात राजर्षी शाहूंच्या जिल्ह्यातून होत आहे, ही अभिमानस्पद बाब आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व संग्राम संस्था (सांगली) यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र विभागात आयोजित 'जबरदस्तीत कसली मर्दानगी' या परिसंवादाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत बोलताना पालकमंत्री सतेज पाटील. सोबत कामगारमंत्री हसन मुश्रीफ, डॉ. व्ही. एन. शिंदे, मीना शेषू, डॉ. भारती पाटील.

पालकमंत्री पाटील म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरीसुद्धा महिलांच्या सुरक्षिततेसाठी कायदा करावा लागतो. याचा अर्थ सुसंस्कारीत पिढी घडवण्यात कमी पडलो की काय, असा प्रश्न आहे.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, चूल व मूल या प्रवृत्तीमुळे भारतच काय आशिया खंड मागे पडला आहे. युरोपीय देशात महिलांना समान संधी दिली आहे. त्यामुळे ते देश प्रगतशील झाले आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिलांना ५० टक्के आरक्षण मिळावे यासाठी पुढाकार घेतला. सरकारने केलेल्या शक्ती कायद्यामुळे राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना चाप बसेल.

यावेळी शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संग्राम संस्थेच्या सरचिटणीस मीना शेषू, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा पाटील, प्रा. डॉ. मेघा पानसरे, कॉ. धनाजी गुरव, प्राचार्य अजेय दळवी, प्राचार्य महादेव नरके, नेहा वाडेकर आदी उपस्थित होते.

लोकमत



आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत विजेता ठरलेल्या महावीर महाविद्यालयाच्या महिला संघासोबत पवन गोरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्रा. डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. रोहित पाटील, स्वप्निल खोत उपस्थित होते.

# आंतरविभागीय बेसबॉल स्पर्धेत 'महावीर'ची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय महिला बेसबॉल स्पर्धेत महावीर महाविद्यालयाने संत गाडगे महाराज कॉलेज (कराड)चा ८-३ असा पराभव करीत अजिंक्यपद पटकाविले.

मेरी वेदर क्रीडांगणावर झालेल्या या अंतिम सामन्यांत महावीरच्या करिष्मा कडचे, ऐश्वर्या पुरी, स्वप्नाली वायदंडे, अश्विनी बळे, वाणी ताटी यांच्या दमदार खेळीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांना नामोहरण केले. अंतिम सामन्यात तर या पाचजणींनी संत गाडगे महाराज कॉलेजचा ८-३ असा धुव्वा उडवित अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची गुवाहाटी येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला बेसबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड झाली. स्पर्धेत एऐससी कॉलेज (रामानंदनगर) तिसरा, तर विवेकानंद कॉलेज संघाला चौथा क्रमांक मिळाला. महावीर संघास क्रीडा विभागप्रमुख डॉ. रोहित पाटील, डॉ. बाबासाहेब उलपे, प्रा. स्वप्निल खोत, प्रा. पवन गोरे यांचे मार्गदर्शन, तर संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे, प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे यांचे प्रोत्साहन लाभले.

लोकसत्ता

# वन्यजीव मानद सदस्यपदी सुजित मुंढे



**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या पर्यावरण वने आणि जलवायू मंत्रालयाच्या अधिनिस्त वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरोचे मानद स्वयंसेवी म्हणून शिवाजी विद्यापीठात कार्यरत सुजित अर्जुन मुंढे यांची निवड करण्यात आली आहे. पर्यावरण विभागाशी निगडित कार्याची दखल घेत अतिरिक्त निर्देशक तथा पोलीस महानिरीक्षक तिलोत्तमा वर्मा यांनी निवडीचे पत्र त्यांना पाठवले आहे. या नियुक्तीमुळे त्यांची वन्यजीव प्रेमी म्हणून नवीन ओळख निर्माण झालेली आहे. मुंढे हे आता वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरोच्या मदतीने वन्यजीव आणि यासंबंधित होणारे गुन्हे रोखण्याकरिता आणि त्याबाबतच्या जनजागृतीकरिता प्रयत्नशील राहणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठातून नोबेल लॉरेट घडविण्यासाठी प्रयत्नशील राहू : डॉ. सोनकवडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सैफ सीएफसी सेंटरमधील पृथक्करणाचा वापर करून भविष्यात विद्यापीठातून नोबेल लॉरेट निर्माण करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन सैफ सीएफसीचे संचालक डॉ.आर.जी.सोनकवडे यांनी केले.

विद्यापीठ सीएफसी अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील होते. डॉ.डी.वाय पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.आर. के. मुदगल म्हणाले, संशोधक विद्यार्थी हेच विद्यापीठाच्या संशोधनाचा कणा आहेत. हे विद्यार्थी पुढे शास्त्रज्ञ म्हणून उदयास येतात. त्यासाठी विद्यार्थ्यांकडे संशोधन अभिवृत्ती असणे गरजेचे आहे.

रिसर्च डायरेक्टर डॉ.सी.डी. लोखंडे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सीएफसी मधील उपकरणाविषयी माहिती घेण्यापेक्षा ती हाताळावीत, जेणेकरून त्यांच्याकडे त्या उपकरणाचे कौशल्य प्राप्त होईल.

अध्यक्षीय भाषणात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करीत असताना कौशल्य विकसित करायला पाहिजेत. आज विद्यापीठाने विविध प्रकल्प हाती घेऊन ते पूर्णत्वास नेले आहेत.

पुढारी

# विद्यापीठातर्फे आजपासून संगीत-नाटक महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे दि. ७ व ८ जानेवारी रोजी अच्युतराव भांडारकर कलादालन, गायन समाज देवल क्लब येथे संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे शुक्रवारी दुपारी ४ वाजता उद्घाटन होणार आहे. प्रथम सत्रात सायंकाळी साडेचार वाजता पंडित रघुनाथ नाकोड यांचे शिष्य तबला वादक डॉ. रवीकिरण नाकोड, धारवाड यांचा एकल तबला वादन कार्यक्रम होणार आहे. दुसऱ्या सत्रात पं. शरद साठे व अरुण कशाळकर यांचे शिष्य मुकुल कुलकर्णी, पुणे हे शास्त्रीय गायन सादर करणार आहेत. शनिवारी (दि. ८) सायंकाळी पाच वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी 'उद्ध्वस्त धर्मशाळा' हे दोन अंकी नाटक सादर करणार आहेत. कोरोनाविषयक नियमांचे पालन करून कार्यक्रम होणार असून निवडक ५० रसिकांनाच प्रवेश असेल, असे विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी कळवले आहे.

पुढारी

# नवीन स्टार्टअप नोंदणीचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, संशोधन व सहचर्य केंद्राच्या अंतर्गत 'एस.यू.के. रिसर्च डेव्हलपमेंट फाऊंडेशन ही सेक्शन ८ कंपनी स्थापन करण्यात आली आहे. नवीन स्टार्ट अपसाठी कंपन्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्रास महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी या राज्य सरकारच्या उपक्रमाचे सहकार्य लाभले आहे. केंद्रामार्फत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात नवीन स्टार्टअप सुरू झाले आहेत. ज्यांनी 'डीआयपीपी'ची नोंदणी केलेल्या अधिकृत कंपन्यांनी विद्यापीठाच्या इन्क्युबेशन केंद्राशी संपर्क साधावा, असे केंद्राचे संचालक प्रा.डॉ.एम.एस.देशमुख यांनी कळवले आहे.

पुढारी

# विद्यापीठातर्फे एम.फिल., पीएच.डी. प्रबंध सादर करण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एम.फिल., पीएच.डी. प्रबंध सादर करण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

कोरोनाचा संसर्गामुळे विद्यापीठाने एम.फिल., पीएच.डी.चा प्रबंध सादर करण्यास मुदतवाढ दिली होती. यासंदर्भात नुकतेच विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पब्लिक नोटीस जारी करून मार्गदर्शक निकष लागू केले आहेत. त्यानुसार ३० जून २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतची अधिक माहिती यूजीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

07 JAN 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी सत्र परीक्षा फेब्रुवारीत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना व ओमायक्रॉन संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ६६४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे २ लाख २० हजार विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या अभ्यासक्रमासाठी परीक्षा अर्ज भरण्याची मुदत संपली आहे.



**वेळापत्रक पुढील आठवड्यात जाहीर**

सध्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. १५ जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत आहे.

प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर व द्वितीय, तृतीय सत्र परीक्षा विद्यापीठ घेणार आहे. अभियांत्रिकी, औषधनिर्माशास्त्र, एमबीए, आर्किटेक्चर, शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होणार आहेत.

सर्टिफिकेट, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा कोर्सच्या परीक्षा त्या-त्या महाविद्यालय, विद्यापीठ अधिविभाग स्तरावर घेतल्या जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

07 JAN 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांचे संशोधन समाजोपयोगी हवे

## घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सध्या संशोधन क्षेत्रात शोधनिबंध प्रसिद्धीवर जास्त भर दिला जातो. शोधनिबंध प्रसिद्ध झाले की, संशोधन कागदावरच राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे संशोधन समाजोपयोगी असायला हवे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्रामध्ये स्ट्राईड प्रोग्राम आणि महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्रास्ताविकामध्ये समन्वयक व सैफचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी कॉमन फॅसिलिटेशन सेंटरबद्दल माहिती दिली. तसेच सेंटरमधील उपकरणांचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, या सेंटरचा उपयोग विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी होणार आहे. हे सेंटर भागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी व औद्योगिक क्षेत्रासाठी खुले आहे. कार्यशाळेत एनसीएल पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पोदार, पार्क सिस्टीमचे शास्त्रज्ञ डॉ. आशुतोष वलवडे, कस्टमर सपोर्ट मॅनेजर डॉ. तुषार भावसार यांनी विद्यार्थ्यांना अटॉमिक फोर्स मायक्रोस्कोपीबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत देशभरातून ३२० विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

यावेळी आयसीटी मुंबईचे कुलगुरू डॉ. अनिरुद्ध पंडित, एनआयटीचे माजी अधिष्ठाता एस. के. चक्रवर्ती, प्रा. डॉ. सोनवणे, प्रा. डॉ. ज्योती जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

07 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक पत्रकारितेची मशाल तेवत ठेवा

## विभागीय माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट : 'स्पीड न्यूज २४'च्या वतीने आदर्श पत्रकारांचा गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पत्रकारांना जनतेच्या प्रश्नांची जाण असते. कारण ते लोकांमध्ये असतात. पत्रकारांमुळेच समाजाचा सतत चौफेर विकास होत असतो. राजकीय पत्रकारिता गरजेची असली तरी राजकारण म्हणजेच सर्वस्व असे नाही. त्यामुळे पत्रकारांनी सामाजिक पत्रकारितेची मशाल तेवत ठेवावी, असे आवाहन कोल्हापूर विभागीय माहिती उपसंचालक डॉ. संभाजी खराट यांनी केले.

मराठी पत्रकार दिनानिमित्त 'स्पीड न्यूज २४' या वेब चॅनेलच्या आदर्श पत्रकार गौरव कार्यक्रमात डॉ. खराट प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी दैनिक 'पुण्यनगरी'चे वृत्तसंपादक राजेंद्रकुमार चौगले यांना आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील गुणवंत पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, निवृत्त सहायक शिक्षण उपसंचालक संपत गायकवाड प्रमुख उपस्थित होते. ताराबाई पार्क येथील विश्वेश्वरय्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास 'स्पीड न्यूज २४'चे संपादक सुहास पाटील व एकनाथ पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : आदर्श पत्रकार गौरव कार्यक्रमात गुरुवारी राजेंद्रकुमार चौगले यांना आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करताना डॉ. संभाजी खराट. सोबत प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, संपत गायकवाड, सुहास पाटील आदी.**

### पत्रकारांकडून समाजाला न्याय : राजेंद्रकुमार चौगले

कोरोनाच्या महासंकटात जीवाची बाजी लावून पत्रकारांनी जनजागृतीचे काम केले आहे. यापुढेही समाजाला न्याय देण्याचे काम पत्रकारांकडून कायम सुरू राहील, असे प्रतिपादन दैनिक 'पुण्यनगरी' चे वृत्तसंपादक राजेंद्रकुमार चौगले यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

प्रा. डॉ. मुडे-पवार म्हणाल्या, पत्रकारिता विभागातून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजाचे प्रश्न तडफेने मांडतात. त्यांचा पाठपुरावा करतात, हे कौतुकास्पद आहे.

निवृत्त सहायक शिक्षण उपसंचालक गायकवाड म्हणाले, मी सोशल मीडियाच्या माध्यमातून पत्रकारिता करतो. जे वाईट आहे त्यावर प्रहार करण्यास मागेपुढे पाहू नये, तसेच चांगले काम करणाऱ्यांचेही कौतुक करावे.

यावेळी पत्रकार व मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. अफ़जल देवळेकर, बाबूभाई मुगडे, विनायक कुलकर्णी, डॉ. जाहदा मुजावर, डॉ. संजय पाटील-वाईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आज संगीत नाट्य महोत्सव



कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधीविभागाने दोन दिवसीय संगीत नाट्य महोत्सवाचे आयोजन केले आहे. उद्या (ता. ७) व शनिवार (ता. ८) या दिवशी महोत्सव होईल. ही माहिती आधीविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी दिली.

महोत्सवांमध्ये उद्या (ता. ७) दुपारी चार वाजता डॉ. रविकिरण नाकोड यांचे तबलावादन होईल. सायंकाळी सहा वाजता मुकुल कुलकर्णी यांचे शास्त्रीय गायन असणार आहे. शनिवारी (ता. ८) सायंकाळी पाच वाजता उद्ध्वस्त धर्मशाळा हा नाट्यप्रयोग सादर केला जाईल. हे सर्व कार्यक्रम अच्युतराव भांडारकर कलादालन येथे होणार आहेत.

07 JAN 2022

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मधमाश्यांचे संवर्धन करू : संदीप दिवाण

**सकाळ वृत्तसेवा**

जरगनगर, ता. ६ : राज्यातील पोलिस वसाहत व राज्य राखीव पोलिस दलातील कँपसमध्ये मधमाशांचे संवर्धन केले जाईल, अशी ग्वाही भारतीय रिझर्व्ह बटालियनच्या ग्रुप तीनचे कमांडंट संदीप दिवाण यांनी दिली. मधूअमृत मधमाशी संवर्धन आणि संशोधन संस्थेतर्फे आयोजित मधुमक्षिका पालन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कात्यायनी येथील पैस शेतीपर्यटन केंद्र येथे कार्यशाळा झाली.



**जरगनगर : मधूअमृत मधमाशी संवर्धन आणि संशोधन संस्थेतर्फे आयोजित मधुमक्षिका पालन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना भारतीय रिझर्व्ह बटालियनच्या ग्रुप तीनचे कमांडंट संदीप दिवाण.**

दिवाण यांनी गावपातळीवर युवकांना संघटित करून मधुमक्षिका पालन व संवर्धन करण्याचा प्रयत्न करेन, असे आश्वासन दिले. तसेच मधमाशांवर भ्रमणध्वनीतून निघणाऱ्या लहरींचा काय परिणाम होतो याचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन केले. संस्थेचे अध्यक्ष दयावान पाटील मधाचा मधूअमृत ब्रँड तयार करतात, हे कौतुकास्पद असल्याचे सांगितले. डॉ. पवन तेली, धैर्यशील लाड, राहुल कांबळे, धर्माजी कांबळे, सचिन देसाई, संभाजी भगत, सदाशिव रेडेकर यांचा सत्कार झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांनी प्रत्येकाने एक मधमाशांची पेटी टेरेस, शेत अथवा फार्म हाऊसच्या ठिकाणी जरूर ठेवावी, असे आवाहन केले. डॉ. एस. आर. यंकंची, डॉ. शरद गलांडे, संभाजी महाडभगत, जोशना देसाई यांनी मधपेटीची रचना, मधमाशांचा जीवनक्रम, मधमाशांचे रोग याबद्दल माहिती दिली. समन्वयक दामोदर पांढरे, तेजस बोधगिरे, अक्षय पवार, प्रतीक सावंत यांनी संयोजन केले.

तरुण भारत



कोल्हापूर : कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी डॉ. आर के मुदगल, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. आर. जी . सोनकवडे, डॉ. जाधव

# विद्यापीठातून नोबेल लॉरेट घडविण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठातील सैफ सीएफसी सेंटरमधील पृथःक्करणाचा वापर करून भविष्यात या विद्यापीठातून नोबेल लॉरेट निर्माण करण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन सैफ सीएफसीचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ सीएफसी अंतर्गत आयोजित कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

डॉ. सोनकवडे म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेस देशभरातून ३२० हुन अधिक विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यामध्ये विद्यापीठाच्या सर्व विज्ञान शाखेचा समावेश आहे. भविष्यात असे अनेक नवे विषय घेऊन आम्ही राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा राबवू‘‘‘

डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठचे कुलगुरू डॉ. आर के मुदगल म्हणाले, संशोधक

- सैफ सीएफसीचे संचालक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे प्रतिपादन

विद्यार्थी हेच विद्यापीठांच्या संशोधनाचा कणा आहेत. हे विद्यार्थीच पुढे शास्त्रज्ञ म्हणून उदयास येतात. काहीतरी माहिती करून घेणे हे संशोधन नाही. काहीतरी नवीन निर्माण करणे म्हणजे संशोधन. संशोधन संचालक डॉ. सी. डी. लोखंडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष्यस्थानावरून बोलताना प्र– कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले‘‘‘ विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करीत असताना कौशल्य विकसित करायला पाहिजेत. विद्यापीठाने विविध प्रकल्प हाती घेऊन ती पूर्णत्वास नेली आहेत. जवळपास ८५ कोटी इतका निधी संशोधनासाठी आणला आहे. या सर्व प्रकल्पामधून आलेल्या उपकरणाचा उपयोग करून नवउद्योजक निर्माण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असेही त्यांनीसांगितले.

तरूण भारत

# विद्यापीठातर्फे आज संगीत, नाट्यमहोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन केले आहे. गायन समाज देवल क्लब येथे आज (दि. ७) दुपारी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

पहिल्या सत्रात दुपारी ४.३० वाजता पं. रघुनाथ नाकोड यांचे शिष्य प्रख्यात तबला वादक डॉ. रविकिरण नाकोड (धारवाड) यांचे तबलावादन होईल. नगमा साथ डॉ. सचिन कचोटे करणार आहेत. दुसऱ्या सत्रात सायंकाळी ६.३० वाजता पं. शरद साठे व पं. अरूण कशाळकर यांचे शिष्य मुकुल कुलकर्णी (पुणे) यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. तबला साथ निखिल भगत, संवादिनी साथ अमित साळोखे करतील.

- **गायन समाज देवल क्लब येथे आयोजन**
- **७ व ८ रोजी सांगितिक कार्यक्रमांची पर्वणी**

शनिवार ८ रोजी सायंकाळी ५ वा. संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचे 'उद्ध्वस्त धर्मशाळा' दोन अंकी नाटक होईल. या नाटकाचे लेखन गो. पु. देशपांडे, दिग्दर्शन ज्ञानेश मुळे, नेपथ्य व प्रकाश योजना डॉ. संजय तोडकर यांनी केले आहे. तरी या कार्यक्रमाला रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी केले आहे.

Times of India

# Nursery dept of SUK spreads awareness on native plants

Rahul.Gayakwad
@timesgroup.com

**Kolhapur:** The nursery department of Shivaji University, Kolhapur (SUK) has put around 20,000 saplings of Indian origin trees on sale in order to promote and increase awareness about the native species.

These saplings have been kept for sale on the university premises at prices starting at Rs 15. The lush green campus of the SUK is known as oxygen park and many people visit the campus to have a walk amidst the green oxygenated surroundings.

Dr V N Shinde, deputy registrar of garden department, said, "The intention behind selling the 20,000 saplings was to increase cover of native plant species in the region. Instead of cutting trees and then worshipping it, we request people to worship the sapling and then plant it so that in this way interest regarding plants will also increase."

Rahul Gayakwad



These saplings have been kept on sale on the university campus at prices starting at Rs 15

Shinde added, "In the greenhouse nursery, we have created saplings of ornamental, floral, ayurvedic and medicinal plants — all of Indian origin. These species are getting scarce as exotic plants are being preferred by the citizens. Few of the plant saplings available in the SUK nursery are Indian rose, fern, coleus, daisy, nishigandha, zenia, gladiolus, banyan, jasmine, aster, fig, ficus, etc. These saplings will be sold at minimum price and people are advised to take these saplings and plant them around their vicinity."

Bharati Raut, a woman who bought the saplings, said, "It is a good initiative by the SUK. Variety of saplings are available here and at a very low cost. Many of the saplings available here are sold at high cost in private nurseries."